# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@chhsambhajinagarmc.org,
est1@chhsambhajinagarmc.org

जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२६/१६१८ दिनांक –१५/०९/२०२६

## सविस्तर जाहिरात

आयुक्त,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हे 'माहिती तंत्रज्ञान सेवा अद्ययावत करणे' या कामासाठी Project Manager (IT) या पदाकरीता मानधन तत्वावर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

संबंधित उमेदवारांनी दि.१८/०९/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सामान्य प्रशासन विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | पद संख्या | अर्हता व प्राधान्य |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागांतर्गत महानगरपालिकेची वेबसाईट अद्ययावत ठेवणे, E-Office प्रणालीचे व्यवस्थापन करणे, महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित केलेल्या विविध ॲपचे व्यवस्थापन करणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क (RTS) अंतर्गत येणाऱ्या सेवा User Friendly करणे इ. | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची B.E. (Computer) / B.Tech. (Computer Science) / B.C.S. / B.Sc. (Computer) / M.C.A. मधील पदवी/ पदव्युत्तर पदवी.<br>२) प्रोग्रामिंग/सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट/वेबसाईट डिझाईनमधील किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३) शासकीय/निमशासकीय सेवेत या प्रकारचे कामकाज केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>४) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

**सर्वसाधारण अटी :-**

१. उपरोक्त नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहील.
२. सदरची नियुक्ती ही ११ महिन्यांच्या कालावधीसाठी राहील.
३. संबंधितास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.
४. संबंधित शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
५. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.
६. संबंधितास महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळणार नाहीत.
७. सदर कामासाठी मानधन रु.७५,०००/- व वाहतूक भत्ता प्रतिमाह देण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

८. संबंधितास नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्यावर सोपविलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही.

९. संबंधितास सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत त्यांनी पूर्ण करणे आवश्यक राहील. उपआयुक्त (माहिती व तंत्रज्ञान) वेळोवेळी त्यांच्या कामाचा आढावा घेवून त्यांच्या कामाचे मूल्यमापन करतील.

१०. संबंधितास प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांबाबत/माहितीबाबत व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

११. सदर जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान १५ दिवस अगोदर निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

१२. उक्त अटी मान्य असल्याबाबत रु.५००/- मुद्रांकावर नोटरी करुन सादर करावे लागेल.

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 14-09-2026
19:22:19

(अमोल येडगे)
(भा.प्र.से.)
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Digitally signed by
Prashant Jagdish Hiswankar
Date: 09-09-2026 16:43:40

Scanned with OKEN Scanner